डिसेंबर 2016 | ₹ 40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 7 | अंक 1

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत



# अर्थपूर्ण

डिसेंबर 2016

वर्ष सातवे
अंक पहिला

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
**020-25430540**
**9921926538**
arthapurna.monthly@gmail.com

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

वार्षिक वर्गणी : ४०० रुपये,
तीन वर्षांसाठी : १००० रुपये
(ई आवृती वार्षिक वर्गणी : ३०० रुपये)

**संपादक** यमाजी मालकर | **सहसंपादक** सम्राट शिरवळकर | **व्यवस्थापक** अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे 411038
**फोन :** 020-25430540, www.arthapurna.org

## अनुक्रमणिका

**ही तर रक्तविहीन क्रांतीची सुरुवात**
**... यमाजी मालकर**
**पान ६**

**मोठ्या नोटांच्या प्रश्नांची ही आहेत उत्तरे**
**...अर्थपूर्ण टीम**
**पान ६**

**विनम्र आग्रह-क्षणचित्रे आणि**
**माध्यमांनी घेतलेली दखल**
छायाचित्रे : दीपक बेंबळे
**पान १७**



# भूमिका



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

# ही तर रक्तविहीन क्रांतीची सुरुवात

**मोठ्या नोटा अंशत: रद्द केल्या गेल्याच्या निमित्ताने अर्थकारणावर देशभर जो जागर सुरू झाला आहे, तो सर्व भारतीय नागरिकांना खरे आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय म्हणजे एक रक्तविहीन अर्थक्रांती झाल्याशिवाय आता थांबणार नाही.**

अर्थक्रांती प्रतिष्ठान गेले 16 वर्षे ज्या आमूलाग्र बदलांचा आग्रह धरत होते, त्याची सुरुवात मोठ्या नोटा अंशतः बंद करून केंद्र सरकारने केली आहे. अर्थक्रांतीचा एक प्रस्ताव आहे आणि त्याचे पाच महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्या आधारे देशात दोन वर्षांत आमूलाग्र बदल होऊ शकतो. या सर्व बदलांची सुरुवात एकाच वेळी केली तर हा बदल अतिशय सुरळीत होईल, असे प्रतिष्ठानचे म्हणणे आहे आणि त्यासंबंधीचा काही अभ्यास प्रतिष्ठानने केला आहे. या प्रस्तावाचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एक उच्चस्तरीय आयोग नेमावा आणि विशिष्ट कालमर्यादेत त्याचा अहवाल देशाला सादर करावा, यासाठी विनम्र आग्रह उपक्रम गेल्या 11, 12 आणि 13 नोव्हेंबर रोजी पुण्यात शनिवारवाड्यासमोर झाला. योगायोग असा की त्यापूर्वी केवळ चार दिवस आधी म्हणजे 8 नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठ्या नोटांच्या संदर्भातील हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. 500 आणि 1000 रुपयांचे चलनातील मूल्य 86 टक्क्यांवर पोचले असून ते देशासाठी चांगले नाही, अशी मांडणी या देशात फक्त अर्थक्रांती प्रतिष्ठान करत होते. अर्थतज्ज्ञ त्याविषयी कधीच आग्रही नव्हते. त्यामुळे हा निर्णय जाहीर झाल्यावर सरकारने अर्थक्रांती प्रतिष्ठानचे म्हणणे अखेर ऐकले, अशा प्रतिक्रिया उमटल्या आणि त्या साहजिकच होत्या.

देशाची आर्थिक स्थिती लक्षात घेतली तर हे ऑपरेशन केले गेले पाहिजे होते, याविषयी माजी पंतप्रधान आणि अर्थतज्ञ मनमोहनसिंग यांच्यासह कोणाचेच दुमत नाही. पण ते ज्या पद्धतीने केले गेले, त्याविषयी प्रत्येकाचे काही म्हणणे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे ऑपरेशन करण्याचे जाहीर केले, तेव्हा त्यांच्या सरकारकडे याविषयी आपल्यापेक्षा अधिक माहिती असेल आणि त्या आधारे त्यांनी हा निर्णय घेतला, असे आम्ही समजतो. मूळात एकदा ऑपरेशन अत्यावश्यक होते, हे मान्य केले की ते करताना रक्त किती गेले, याला फार महत्त्व उरत नाही. युद्धात जसे आपल्या देशाचे संरक्षण महत्त्वाचे ठरते, तसेच हे आहे. अर्थात या निर्णयाची अंमलबजावणी कशी केली पाहिजे, हा सरकारचा विषय असून सरकार त्याच्या बाजूने परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न करते आहे. ऑपरेशन यशस्वी व्हावे आणि हा देश पुढे जावा, अशी प्रार्थना आपण करू यात.

हा रोग किती जुना आणि तो शरीरात किती भिनला होता, हे पाहिले की त्याचा एवढा त्रास का झाला, हे लगेच लक्षात येते. शेतसारा रुपयांतच दिला पाहिजे, अशी सक्ती ब्रिटिशांनी भारतीय शेतकऱ्यांवर केली तेव्हापासून आपल्या देशाचे पैशीकरण सुरू झाले. तोपर्यंत भारतीयांना चांदी आणि सोन्याची नाणी पैसे म्हणून वापरण्याची सवय होती. काही राजांचे चलन चलनात होते, मात्र त्यात एकवाक्यता नव्हती. ही संधी साधून ब्रिटिशांनी सर्व भारतात चालणाऱ्या रुपया नावाच्या नव्या चलनाला जन्म दिला. पण हे कागदी चलन भारतीयांना काही पटले नाही. त्यामुळे हे कागदी

चलन सर्वमान्य होण्यासाठी बराच कालावधी गेला. बहुसंख्य असलेल्या शेतकऱ्यांनी ते स्वीकारावे, यासाठी अखेर त्याची सक्ती करावी लागली. या कागदी पैशांत अडकलेला शेतकरी वर्ग त्यातून अजूनही म्हणजे पावणे दोनशे वर्षे झाली तरी बाहेर पडू शकला नाही. शेतकऱ्यांचे आणि या देशाचे शोषण करण्यासाठी ब्रिटिशांनी रुपया वापरला आणि आज स्वतंत्र भारतात ज्यांनी रुपयाचे म्हणजे पैशांचे महत्त्व ओळखले, त्या वर्गानेही त्याच मार्गाने शेतकऱ्यांचे शोषण सुरूच ठेवले आहे.

सर्व कष्ट, उत्पादन आणि संपत्ती आम्ही आज रुपयांत मोजतो आहोत आणि आधुनिक जगात त्याला दुसरा मार्ग नाही. त्यात्यामुळे चलन नावाचे हे गारुड सर्वांना वापरायला मिळाले पाहिजे आणि ते प्रवाही असले पाहिजे, याविषयी शंका असण्याचे कारण नाही. कारण चलनाची निर्मितीच मुळात माध्यम म्हणून झाली आहे. पण मोठ्या मूल्याच्या चलनामुळे ती वस्तू म्हणून वापरले जात असल्याने आज आर्थिक कोंडी झाली आहे. हवेवर आणि भाषेवर आपली खासगी मालकी दाखविले तर चालेल का?

कागदाला सरकारने ‘लीगल टेंडर’ म्हटले की त्याचा पैसा होतो. त्याची किती निर्मिती करायची, याचा अधिकार ब्रिटीश सरकारने घेतला आणि नोटांची अधिक छपाई करून भारतीय कष्ट आणि उत्पादने स्वस्तात विकत घेण्यास सुरुवात केली. तो शिरस्ता स्वतंत्र भारतातील सरकारे आणि या जादूई कागदाचे महत्त्व ओळखणाऱ्या वर्गाने आजपर्यंत चालू ठेवला आहे. गेल्या काही दिवसांत बँकेत जमा झालेल्या सात आठ लाख कोटी रुपयांनी आणि सर्वत्र सापडणाऱ्या नोटांच्या पोत्यांनी ते सिद्धच केले आहे. 30 डिसेंबर अखेर किती लाख कोटी रुपये जमा होतील, हे पाहिल्यावर हा पैसा बँकेबाहेर होता, तरी हा देश जिवंत कसा होता, असा प्रश्न पडेलच. एकेकाळी कागदी नोटांना हात न लावणारा समाज त्या नोटा म्हणजे सबकुछ आहे, असे आता मानू लागला होता, हे फार भयानक सत्य आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक अर्थतज्ञ म्हणून या प्रश्नाचा सर्वांत आधी उलगडा केला आणि रुपयांत भारतीयांचे होणारे शोषण किती भयानक आहे, हे दाखवून दिले आहे. ‘ईस्ट इंडिया कंपनी: प्रशासन आणि वित्तप्रणाली’ हा त्यांचा या विषयावरील पहिला ग्रंथ. या शोधनिबंधात त्यांनी 1792 ते 1858 या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तप्रणाली संबंधीच्या धोरणातील बदलाचा आढावा घेतला आहे. ‘ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती’ हा त्यांनी पीएच.डीसाठी कोलंबिया विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध. (1927) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स या अत्युच्च पदवीसाठी लिहिलेला ‘रुपयाचा प्रश्न: उद्गम आणि उपाय’ या प्रबंधात त्यांनी भारतीय चलनाचा विनिमयाचे साधन म्हणून झालेला विकास आणि सोने, चांदी अशा मौल्यवान धातूंच्या संदर्भातील त्याची सममूल्यता याची चर्चा केली आहे.

डॉ. आंबेडकर यांना, भारताला आर्थिक साक्षर करण्याचा मार्ग सोडून जातिभेदाविरुद्धचा लढा हाती घ्यावा लागला. देशाच्या दृष्टीने एवढा महत्त्वाचा विषय इतक्या पोटतिडकीने मांडण्याचे धाडस पुढे कोणी केले नाही. त्यामुळे रुपयाचे गुपित कळणारा वर्ग मर्यादितच राहिला, एवढेच नव्हे तर गेली किमान दीडशे वर्षे बहुजन भारतीय समाज रुपयाच्या या चक्रव्यूहात फसत राहिला. स्वतंत्र भारतातही गेली 70 वर्षे त्यात मोठा बदल होऊ शकला नाही. सरकारने मोठ्या नोटा कमी करण्याचा परवा निर्णय घेतल्यानंतर तो भांबावला, त्याचे कारण हे आहे.

पण या भांबावण्यात एक गोष्ट खूप चांगली झाली. अर्थकारणाविषयी




तो अजिबात बोलत नव्हता, कागदी नोटा, त्यांचे प्रमाण, रिझर्व बँक, करव्यवस्था, व्याजदर हे त्याचे कधीच विषय नव्हते. ते त्याचे विषय झाले. एकूणच ज्या अर्थकारणाने त्याचे सारे आयुष्य बांधून टाकले आहे, त्याविषयी तो कालपर्यंत मूक होता. तो आता उघडपणे बोलू लागला आहे. वाद घालू लागला आहे. काय झाले पाहिजे, हे सांगू लागला आहे. देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यासोबत जे राजकीय स्वातंत्र्य मिळाले, ते पुरेसे नाही, राजकारणाला चालविणाऱ्या अर्थकारणाविषयीही आता आपण बोलले पाहिजे, याची त्याला जाणीव होऊ लागली आहे आणि हे फार महत्त्वाचे आहे. एवढे महत्त्वाचे की, स्वतंत्र भारतात ज्या आर्थिक स्वातंत्र्याचे स्वप्न सर्वसामान्य नागरिक पाहतो आहे, त्या दिशेने जाण्याची सुरुवात आता झाली आहे.

अर्थात, लाखो शेतकऱ्यांनी, आपण या व्यवस्थेत जगू शकत नाही, म्हणून आत्महत्या केल्या, हे कसे विसरता येईल? त्या आत्महत्या हा आपल्या देशातील उरफाट्या अर्थकारणाचा थेट परिणाम आहे. या ऑपरेशनला आज सुरुवात केली नसती तर भविष्यात अशा किती आत्आत्महत्या पाहण्याची वेळ आपल्यावर आली असती, याची कल्पना करवत नाही. लोकसंख्येची घनता प्रति चौरस किलोमीटर तब्बल 425 इतकी असलेला देश पैसा

नावाच्या राक्षसाला शरण गेला आणि त्याने मागणी केल्यानुसार आपल्याच माणसांना बळी देत गेला. हे बळी जाणे, आता आपल्या आजूबाजूला दिसू लागले होते आणि त्याला वेगवेगळी नावे देण्याचे काम आपल्यातलीच काही मंडळी हिरिरीने करत होती. आपल्याला त्या राक्षसाचे बोलावणे येऊ नये, एवढा संकुचित विचार करणे, खरे तर पाप होते. पण ते पाप आपल्यातील अनेकांनी केले. असो..

हे ऑपरेशन अवघड खरे, पण ते टाळता येणार नाही. ते टाळले, तर आपल्याला फक्त पोस्टमार्टेम करावे लागेल, असे अर्थक्रांती म्हणत होती. कारण हा इलाज आत्ताच केला नसता, तर या देश रक्तरंजित क्रांतीला सामोरा गेला असता. विषमतेचे पीक इतके माजले आहे की त्याला उखडून टाकणे, हे एक समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. त्या जबाबदारीच्या भावनेतून अर्थक्रांती प्रतिष्ठान पाच मुद्द्यांचा प्रस्ताव गेली 16 वर्षे मांडते आहे. केवळ मोठ्या नोटा कमी करून प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी करपद्धतीत अर्थक्रांती सांगते तसा बदल करावाच लागेल. त्याची सुरुवात म्हणून सरकारने हे पाऊल उचलले असे आम्ही समजतो.

या देशात आणि समाजात किती प्रचंड ताकद आहे, याची आपल्यापैकी अनेकांना अजून जाणीव नाही. ते देश आणि आपला समाज किती वाईट आहे, याचे चित्र रंगविण्यात आपली बुद्धी खर्च करत आहेत. आता, अर्थशास्त्रातील 'मागणी'च्या बाजूने विचार करायचा तर भारतातील 130 कोटी लोक जेवढी 'मागणी' करू शकतात, तिला जगाच्या पाठीवर तोड नाही. त्यामुळे पुढील महिनाभरातया शस्त्रक्रियेच्या काही जखमा भरून येतील. पण यानिमित्ताने अर्थकारणावर देशभर जो जागर सुरू झाला आहे, तो सर्व भारतीय नागरिकांना खरे आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय म्हणजे एक रक्तविहीन अर्थक्रांती झाल्याशिवाय थांबणार नाही.

●●●

---

# तेव्हा पाच रुपयांची नोट मोठी होती!

'ज्या देशात जास्तीत जास्त व्यवहार सरासरी एक रुपयात व बहुतांशी एक आणा वा त्याहून कमी पैशांत होतात, त्या देशात लोकांच्या व्यवहारात कागदी चलनाचा वापर मोठ्या प्रमाणावर होईल, अशी अपेक्षा बाळगणे व्यर्थ आहे. 1871 साली प्रथमच चलनात आणलेली पाच रुपये मूल्याची नोटसुद्धा लोकव्यवहारात शिरकाव करू शकण्याएवढी लहान नव्हती.'

**तेव्हाही आणि आताही**

'इंग्लडमधील बँका पतपुरवठ्यासाठी नोट पद्धतीच्या जागी धनादेश पद्धती रुजविण्यात यशस्वी झाल्या होत्या, परंतु भारतातील बँका त्यात अपयशी ठरल्या होत्या. अर्थात देशातील प्रचंड निरक्षरता आणि ग्रामीण भागातील बँकिंग सुविधांचा अभाव ही या अपयशाची कारणे आहेत'.

'संपत्ती ही राष्ट्राच्या भरभराटीस मोठी कारणीभूत अशी वस्तू आहे. या दृष्टीने तिचा संग्रह करणे अत्यंत आवश्यक आहे, परंतु संपत्तीचा उपयोग गरीब प्रजेस जखडून ठेवण्याकडे किंवा तिची वाढ खुंटविण्याकडे आणि आपली प्रौढी व वर्चस्व माजविण्याकडे जेव्हा संपत्तीवान लोक करतात तेव्हा त्यांच्या संपत्तीला शास्त्रकारानी आसुरी संपत्ती असे म्हटले आहे आणि तिचा धिक्कार केला आहे'.




**डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.** (27 **नोव्हेंबर** 1927, **सोलापूर**)